Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/खाजगी विदयार्थी./१०वी/ 1815
कोल्हापूर-०४
दिनांक :२८/०८/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्वमान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविदयालये,
सातारा, सांगली ,कोल्हापूर

विषय :- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२वी) खाजगी विद्यार्थी फॉर्म नं.१७ बाबत.
संदर्भ :- क्र.रा.मं./परीक्षा-३/३२०३ दि.१२/०८/२०२४ रोजीचे राज्यमंडळाचे पत्र.

माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२५ साठी खाजगी विद्यार्थी फॉर्म नं.१७ भरण्याबाबत विभागीय मंडळाच्या संकेतस्थळावर सूचना देण्यात आलेल्या आहेत. ऑनलाइन नांवनोंदणी अर्ज भरण्याची मुदत दि.१३/०८/२०२४ ते ३०/०९/२०२४ तसेच विलंब शुल्काच्या तारखा मंगळवार दि.०१/१०/२०२४ ते ३०/१०/२०२४ अशा निश्चित केलेल्या आहेत.

मंडळाने यावर्षी पासून खाजगी विद्यार्थी नांवनोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७ ) भरण्याबाबत तसेच छाननी/तपासणीबाबतची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पध्दतीने राबविलेली आहे. तरी मंडळाच्या असे निदर्शनास येते की, विद्यार्थ्यांनी ऑनलाइन भरलेले फॉर्म शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित (pending) दिसत असलेमुळे विभागीय मंडळ स्तरावर फॉर्मवर कोणतीही कार्यवाही करता येत नाही. तेव्हा आपणास सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्याने फॉर्म नं १७ भरण्याबाबतची प्रक्रिया ऑनलाइन करुन फॉर्म आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित (pending) राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी. तेव्हा विद्यार्थ्याने फॉर्म नं .१७ ऑनलाइन भरल्याची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर खालीलप्रमाणे शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

## फॉर्म नं.१७ साठी मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी करावयाची कार्यवाही

**http://mahahsscboard.in**

↓

**Institute login (इन्स्टिटयुट लॉगिन)**

↓

**Enrollment ( form १७)/ Eligibility /college/schoolprofile/internal marks**

↓

**Sign in (SSC/HSC)**

[P.T.O]

↓

**User id (School/College)**

↓

**Password**

↓

**Sign in**

↓

**Application**

↓

**Manage १७ C**

↓

**Action**

↓

| Back | Incomplete | Approved | Not eligible |
|---|---|---|---|

↓

## SEND TO DIVISIONAL BOARD

विद्यार्थ्याने भरलेले अर्जाची प्रिंट व मूळ कागदपत्रे आपल्याकडे ठेवावीत मूळ कागदपत्रे व अर्ज मंडळाकडे
जमा करु नये, याबाबत प्रामुख्याने आपणांस सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांना पालकांना अथवा शाळा/ कनिष्ठ
महाविद्यालय प्रतिनिधींना याबाबत मंडळाकडे पाठवू नये, सर्व प्रक्रिया ऑनलाईन होणार असल्याने त्रुटी, पात्र व अपात्र हे
विद्यार्थ्यांना व आपणांस एस.एम.एस., ई- मेल व्दारे कळविले जाणार आहे. त्रुटींची पूर्तता ऑनलाइन करावयाची आहे.

पात्र विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र (EC) ऑनलाइन त्यांच्या मोबाईल, ई-मेल , एस.एम.एस.व्दारे
कळविण्यात येणार आहे. त्यांनी ते download करुन शाळा /महाविद्यालयात जाऊन परीक्षा फॉर्म भरावयाचा आहे.
नांवनोंदणी प्रमाणपत्र (E.C ) मिळाल्यानंतर परीक्षा आवेदनपत्र भरुन घेण्याची जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.
विद्यार्थी बहिस्थ असल्याने त्याची प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा तसेच परीक्षा आवेदन पत्र भरण्याबाबत त्यांच्या संपर्कात राहून
कार्यवाही करावी.

विद्यार्थी फॉर्म जमा करण्यासाठी आल्यावर नाकारण्यात येवू नये तसेच ज्यादा शुल्काची फी मागणी करु नये तसे
आढळून आल्यास मंडळ नियमावलीनुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ.कोल्हापूर